# वसई-विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती - बी, नालासोपारा
## ता.वसई, जि. पालघर

जा.क्र. वविशम/साप्रवि/८३६/२०१८
दिनांक :- १५/ ११ /२०१८

## जाहिर दरपत्रक

याद्वारे पुरवठादार यांचेसाठी कळविण्यांत येते की, महानगरपालिकेच्या नालासोपारा शालेय कला-क्रिडा महोत्सव २०१८ साठी खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे ट्रॉफी, मेडल व टी-शर्ट साहित्य पुरविण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडुन दि. २६/११ /२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद पाकिटातुन खालील बाबींसाठी दरपत्रक मागविण्यांत येत आहे. सदरची दरपत्रक प्रभाग समिती - बी, नालासोपारा येथील आवक-जावक विभागात सादर करण्यात यावीत.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १. | टि-शर्ट नमुन्याप्रमाणे महानगरपालिका लोगो व नावासहित प्रिंटीग करुन देणे. | प्रती नग |
| २. | वसई-विरार शहर महानगरपालिका आयोजित कला-क्रिडा स्पर्धेसाठी स्मृतीचिन्ह (ट्रॉफी) | |
| अ) | ॲक्रेलिक ट्रॉफी | |
| | १. ६ इंच | प्रती नग |
| | २. ८ इंच | प्रती नग |
| | ३. १० इंच | प्रती नग |
| | ४. १२ इंच | प्रती नग |
| | ५. १६ इंच | प्रती नग |
| | ६. बेस (स्तंभ) एस.एस. ब्रश १८ इंच | प्रती नग |
| | ७. मध्ये ब्लॅक प्लेटींगसहित २४ इंच | प्रती नग |
| ब) | ब्रास मेडल फेन्सी | |
| | १. २ इंच X २ इंच | प्रती नग |

### अटी-शर्ती

१. पुरवठादाराने स्वत:चे लेटरपेडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर जी.एस.टी. क्रमांक असणे बंधनकारक राहील.
२. मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती - बी, नालासोपारा येथील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थीत राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
५. दरपत्रकात नमुद वस्तुंचे/ साहित्यांचे दर हे सादर करताना सर्व करासहित व वाहतूक खर्चासहित दर दर्शविण्यात यावेत.
६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार मा. अति आयुक्त यांना राहील.
७. वरील अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.
८. यासंबधीची दरपत्रके स्वत:चे लेटरपेडवर बंद पाकिटातुन दि.२६/११/२०१८ रोजी दु. ३.०० वाजता प्रभाग समिती - बी, नालासोपारा येथे सादर करावीत.
९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २६/ ११ / २०१८ रोजी संध्या ४.०० वाजता मा. अति आयुक्त यांचे दालनात उपस्थीत दरपत्रकादार अथवा त्यांचे प्रतिनीधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ :- प्रभाग समिती -बी, नालासोपारा
दिनांक :-

अति.आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका